
पुण्यनगरी

# सामाजिक भान जपत कलेचे सादरीकरण



## शिवाजी विद्यापीठाचा ३८ वा युवा महोत्सव






**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयात विद्यापीठाच्या युवा महोत्सवात कलांचे सादरीकरण करताना विद्यार्थी.** (सर्व छाया : एस. अली)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विविध ताल आणि वाद्यातून निघणारे सूर, वाद्य वाजविण्यातील कौशल्याचे दर्शन घडविणारे कलाकार, वाद्यांच्या तालावर प्रेक्षक असलेल्या महाविद्यालयीन तरुण-तरुणींनी टाळ्या, शिट्या आणि धरलेला ताल अशा उत्साही वातावरणात महावीर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विविध कलांचे सादरीकरण करण्यात आले. त्याचबरोबर समाजिक भानही जपण्यात आले.

महोत्सवात जिल्ह्यातील ५५ महाविद्यालयांचे संघाच्या ११०० विद्यार्थ्यांनी १४ प्रकारच्या कलांचे सादरीकरण केले. मुख्य मंचासह एकाचवेळी विविध पाच रंगमंचावर कलांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये एकांकिका स्पर्धा, लघुनाटिका, पथनाट्य, लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, लोकनृत्य, मूकनाट्य स्पर्धा, नकला, सुगम गायन, भारतीय समूहगीत, वादविवाद स्पर्धा, मराठी, हिंदी अणि इंग्रजी भाषेत रंगलेली वक्तृत्व अशा १४ प्रकारच्या स्पर्धा दिवसभरात पार पडल्या. महावीर महाविद्यालयातर्फे दोन हजार विद्यार्थ्यांच्या जेवणाचीही सोय केली होती.

हे विविध कलाप्रकार सादर करताना कलाकरांबरोबरच प्रेक्षकांमध्येही मोठा उत्साह होता. यामधील लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला आणि लोकनृत्याच्या स्पर्धेवेळी उपस्थितांपैकी बहुतांश प्रेक्षक ताल धरण्यापासून स्वतःला रोखू शकले नाहीत. तर या उत्साहाबरोबरच सामाजिक भान जपत विविध कलांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये 'घाम आमचा शेतात गळ, चोर आयचत गाठोड घेऊन पळ, सांगा धनाचा साठा कुठं हाव व.. त्यातला आमचा वाटा कुठं हाय व..' असा शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणाऱ्या तसेच शेतीमाल आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देणारे पथनाट्यही सादर करण्यात आले. यावेळी महिला सुरक्षा याच्यासह विविध सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला, तर वक्तृत्व स्पर्धामध्ये विविध विषयांची अभ्यासपूर्ण मांडणी करून त्या विषयांवर प्रकाश टाकण्यात आला.

लोकमत

## ५५ महाविद्यालयांचा सहभाग : लोकसंगीतासह विविधरंगी कार्यक्रमांचे सादरीकरण

# युवा महोत्सवात संस्कृती दर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकसंगीत, पारंपरिक नृत्य, सुगम गायनाची रंगलेली मैफील... एकांकिकांद्वारे केलेल्या सादरीकरणातून विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांची एक्स्प्रेस धावली ती ३८ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात. या महोत्सवाद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन दाखविण्यात आले.





युवा महोत्सवात शनिवारी युवकांचा जल्लोष दिवसभर असा टिकून होता.

शिवाजी विद्यापीठ व महावीर कोल्हापूर यांच्यातर्फे या युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक असे नृत्याविष्कार सादर करुन महोत्सवात अधिकच रंगत आणली.

शनिवारी या महोत्सवाचे उद्घाटन खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. उद्घाटनानंतर खऱ्या अर्थाने युवा महोत्सवात सादरीकरणासाठी लगबग सुरू झाली. येथील खुला मंच येथे लोकवाद्यवृंदाद्वारे सादरीकरणाला टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात दाद मिळत होती. दुसऱ्या बाजूला एकांकिका, पथनाट्य, वक्तृत्व स्पर्धा सुरु होती. यामधून स्त्रियांवरील अत्याचार, पुनर्जन्म, आतंकवाद, पर्यावरण रक्षण, महिला सुरक्षा, आजची तरुण पिढी, भारताचे बदलते स्वरुप या ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला.

प्रत्येक देशाच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणजे त्या देशाचे लोकसंगीत. भारताला तर लोकसंगीताची समृद्ध परंपरा आहे. भारतीय अभिजात संगीताचा उगम या लोकसंगीतामधूनच झाला; पण दुर्दैवाने वाढत्या नागरीकरणाबरोबर शहरातील माणसांची या संगीतप्रकाराशी फारकत होत गेली. मराठी लोकसंगीत म्हटले की फक्त लावणी आणि कोळीगीतेच समोर येतात. पोवाडा, भारुड, गोंधळ असे अनेक प्रकार आज सहसा ऐकू येत नाहीत. **वासुदेवगीते, ओव्या हे प्रकार तर त्यापेक्षाही दुर्मीळ होत आहेत. मात्र आजच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात महाराष्ट्राच्या याच लोककला, लोकसंगीताचा जागर करण्यात आला. नुसताच जागर न करता युवकांना त्यावर डोलण्यासही भाग पाडले.** रात्री उशिरापर्यंत हा जल्लोष सुरु होता.

यंदा या महोत्सवासाठी उच्चांकी नोंदणी झाली होती. महोत्सवाचा निकाल मध्यरात्री जाहीर होणार असल्याने सर्वांची उत्सुकता ताणली होती.

## ११०० विद्यार्थी सहभागी

जिल्हास्तरीय ३८ व्या युवा महोत्सवात ५५ महाविद्यालयांतील १४ कलाकृतींसाठी ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये एकांकिकांमध्ये ८, लघुनाटिकांसाठी २६, पथनाट्यांसाठी २७, लोकसंगीत वाद्यवृंदासाठी ७, लोककलेसाठी १२, लोकनृत्यासाठी १०, मूकनाट्यासाठी २३, सुगम गायनासाठी २१, भारतीय समूहगीतासाठी २३, वादविवाद स्पर्धेसाठी २०, प्रश्नमंजूषेसाठी १, वक्तृत्व स्पर्धेसाठी ७२ संघांनी सहभाग घेतला होता.

### नियोजनबद्ध व्यवस्था

महावीर कॉलेजचे एन.सी.सी.चे पथक, स्वयंसेवक व प्राध्यापकांनी युवा महोत्सवात सर्व व्यवस्था नियोजनबद्ध केली होती. कॉलेजच्या प्रवेशद्वारापासून ते आवारापर्यंत एनसीसी कॅडेट स्पर्धकांना मार्गदर्शन करत होते.

लोकमत

आदित्य वेल्हाळ








कोल्हापुरातील महावीर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित ३८व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे शनिवारी खासदार धनंजय महाडिक यांनी दीपप्रज्वलन करून उद्घाटन केले. यावेळी ॲड. के. ए. कापसे, महावीर देसाई, ॲड. अभिजित कापसे, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे, गुणवंत रोटे, सुषमा रोटे, डॉ. अरुण पाटील, डॉ. शरद गायकवाड उपस्थित होते. या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी लोककला, लोकसंगीताचा जागर केला.

28 OCT 2018 Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity youth festival gets rousing response

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Kolhapur district's youth festival under the Shivaji University, Kolhapur (SUK) received a strong response on Saturday, as the number of participants exceeded the organizers expectations.

R V Gurav, director of students' welfare, told **TOI** that as many as 19 teams participated for the one-act play, while 34 teams participated in the singing event and around 28 teams participated in the folk-dance event.

"This response is something that we had definitely not expected. It will take till 2am the following night to end all the events and then to declare the results," he said.

Rahul Gayakwad



The festival was inaugurated at the Mahavir College on Saturday

According to Gurav, the results are generally conveyed to the colleges via e-mail. We don't declare it at the venue as many teams from the rural areas generally return to their respective destinations after the late-night events and to make sure that there are no wild celebrations, we directly convey the results to the colleges via e-mail.

He added that the host college had done well in terms of organizing the event and he had not received any complaints at the time of reporting.

"We are making sure that all the basic facilities are available to the students and their performance remains top-notch at the festival, which is held only once a year," he said.

He added that Sangli district will host its youth festival on October 29 at the Shrimant Babasaheb Deshmukh College in Sangli. After completing the district level rounds, winners will advance to the central youth festival scheduled at Willingdon College in Sangli from October 31 to November 2.

पुढारी

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वासाठी युवा महोत्सव आवश्यक

## खा. महाडिक; युवा महोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिकीकरणात टिकण्यासाठी अष्टपैलू व्यक्तिमत्त्व अत्यावश्यक आहे. यासाठी खेळ आणि कला क्षेत्रात विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहित केले पाहिजे. शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव युवकांना अष्टपैलू व्यक्ती घडवण्यासाठी आवश्यक असल्याचे मत खा. धनंजय महाडिक यांनी मांडले.

महावीर महाविद्यालय येथे ३८ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे शनिवारी सकाळी दीपप्रज्वलनाने खा. महाडिक यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अ‍ॅड. के. ए. कापसे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांत बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

खा. महाडिक म्हणाले, जिद्द, आत्मविश्वास आणि कष्ट ही यशाची त्रिसूत्री आहे. काही विद्यार्थ्यांना अलीकडे नैराश्य आल्याचे दिसून येते. परंतु, कला आणि खेळाला प्रोत्साहन दिल्यास युवकांना कधीही नैराश्य येणार नाही. अ‍ॅड. कापसे म्हणाले, युवकांमध्ये चैतन्य पान २ वर

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे महावीर कॉलेज येथे शनिवारी दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना खा. धनंजय महाडिक. शेजारी ॲड. के. ए. कापसे, महेश काकडे, प्राचार्य आर. पी. लोखंडे, डॉ. अरुण पाटील आदींसह मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वासाठी युवा महोत्सव आवश्यक

(पान १ वरून) निर्माण करण्यासाठी युवा महोत्सव गरजेचा आहे.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य आर. पी. लोखंडे, ॲड. अभिजित कापसे, डॉ. अरुण पाटील, विलास सोयम, सिनेट सदस्य मधुकर पाटील आदी उपस्थित होते..

### ११०० विद्यार्थ्यांचा सहभाग

युवा महोत्सवात एकूण १४ कला प्रकारांत ५५ संघांनी सहभाग घेतला. एकूण १,१०० विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांत महोत्सवात कला सादरीकरण केले.

## रंगीबेरंगी आकर्षक वेशभूषा

*युवा महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील विविध भागांतून सकाळी सातपासून विद्यार्थी दाखल झाले होते. हे विद्यार्थी त्यांच्या कला प्रकारानुसार ड्रेस परिधान करून कॅम्पसमध्ये विविध ठिकाणी वावरत होते. या रंगीबेरंगी ड्रेसमुळे जणू काही फुलपाखरांचा मेळा जमल्यासारखे चित्र दिसून आले. चार ठिकाणी विद्यार्थ्यांना कला सादरीकरणाचे नियोजन केले होते. या चारीही ठिकाणी पंचांच्या माध्यमातून गुणांकन दिले जात होते. स्पर्धा असल्याने ईर्षेने विद्यार्थी कला सादर करीत असल्याचे दिसून आले.*

यंदाच्या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक कला प्रकारांचे उद्घाटन विद्यापीठाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यामुळे या महोत्सवात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात अधिकारी उपस्थित होते..

### महावीरचे आकर्षक कॅम्पस

युवा महोत्सवासाठी यजमान असलेल्या महावीर महाविद्यालयाने कॅम्पस सजवले होते. प्रवेशद्वारापासून विविध रंगांचे ध्वज लावण्यात आले होते. आकर्षक फुलांच्या रांगोळी तसेच ठिकठिकाणी संदेश फलक लावण्यात आले होते. कॅम्पसमध्ये मार्गदर्शनासाठी एनसीसीचे विद्यार्थी तैनात करण्यात आले होते.